# शेतकरी-शेतमजूर पंचायत कार्यकर्त्यांची बैठक

## निकडीच्या चार प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्धार

ता. ४ एप्रिल १९७७ रोजी पुण्यात शेतकरी-शेतमजूर पंचायतीच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची बैठक पुणे येथे अध्यक्ष श्री. बा. न. राजहंस यांच्या पुढाकाराने भरली होती. शेतमजूर, दलित आणि अल्पभूधारक हा समाजातील सर्वांत वंचित, शोषित असा वर्ग आहे. दारिद्र्यरेषेखालचे जीवन जगणाऱ्या या मंडळींचे प्रश्न सोडवण्यासाठी संघटितपणे प्रयत्न कसे करावे हे ठरवणे, हा बैठकीचा उद्देश होता बैठकीला महाराष्ट्राच्या विविध भागांतून सुमारे पंचवीस प्रमुख कार्यकर्ते हजर होते.

### स्पष्ट भूमिका

शेतकरी या सदरात एक गुंठा जमिनीच्या मालकांपासून ते शेकडो एकरांची बागाईत करणारांपर्यंत सर्वांचा समावेश होत असला तरी शेतकरी-शेतमजूर पंचायत ही प्रामुख्याने भूमिहीन, शेतमजूर व ज्या शेतकरी कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ३००० रुपयांपेक्षा कमी आहे अशांचीच संघटना करील ही भूमिका या बैठकीत स्पष्ट करण्यात आली. इतर शेतकऱ्यांचेही पुष्कळ प्रश्न आहेत व देशातील शेतीसबंधी सुस्पष्ट धोरण ठरवले पाहिजे हे खरे असले तरी त्यासाठी शेतकरी-शेतमजूर पंचायत हे व्यासपीठ होऊ शकत नाही. त्यासाठी राजकीय पक्ष किंवा अन्य संघटनांचा उपयोग करावा लागेल, असा खुलासाही या बैठकीत करण्यात आला.

खालील चार प्रश्नांवर येत्या वर्षात लक्ष केंद्रित करावे, असे ठरवण्यात आले, व त्या दृष्टीने खालील मागण्या निश्चित करण्यात आल्या :

महाराष्ट्र सरकारने सध्या ठरवलेले किमान वेतन हे अत्यंत अपुरे असून त्याच्या अंमलबजावणीची व्यवस्थाही असमाधानकारक आहे म्हणून किमान वेतनात वाढ करून या वेतनाची अंमलबजावणी करण्यासाठी तालुका पातळीवर त्रिपक्षीय यंत्रणा उभारण्यात यावी व सर्व तक्रारींचे निराकरण तीन महिन्यांच्या आत व्हावे.

रोजगार हमी योजनेखाली जायकवाडीसारखी योजनेतील कामे करून लोकांची दिशाभूल करण्यात येत आहे. जायकवाडी धरणाचे कोट्यवधी रुपयांचे काम या योजनेखाली घेतल्यामुळे इतर ठिकाणी लोकांच्या मागणीप्रमाणे कामे सुरू होत नाहीत. काम मागणारांनी अर्ज केल्यापासून १५ दिवसांत काम देण्याचे आश्वासन पार पाडले जात नाही, म्हणून अर्ज केल्यापासून १५ दिवसांत काम न पुरवल्यास [illegible] ास १६ व्या दिवसापासून रोजी किमान एक रुपया फक्त देण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी.

गेल्या ४० वर्षांत दलित समाजातील हजारो लोकांच्या जमिनी कुळवहिवाटीने किंवा कर्जापोटी अगर दंडेलीने व लबाडीने दलितेतर लोकांच्या हाती गेल्या आहेत. अशा सर्व जमिनी मूळ दलित मालकांना परत मिळण्याची कायदेशीर तरतूद व्हावी.

### शेतकऱ्यांच्या कर्जाचा प्रश्न

महाराष्ट्रात हल्ली शेतकऱ्यांची कर्जवसूली सक्तीने चालू आहे. त्यात अल्पभूधारक, गरीब व दुष्काळी भागातील शेतकरी भरडले जात आहेत. अल्पभूधारक दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या जमिनींवर बंडिंग किंवा अन्य सुधारणेची कामे करण्यासाठी सरकारने केलेला खर्च त्यांच्यावर कर्जरूपाने लादला गेला आहे. हे लादलेले कर्ज माफ करावे व शेतकऱ्यांनी घेतलेल्या इतर कर्जांची चौकशी करून हे कर्ज कशासाठी वापरले गेले, कर्जदार शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती कशी आहे, वगैरे गोष्टींची चौकशी करून या कर्जफेडीच्या बाबतीत कर्जदार शेतकऱ्यांना हप्तेबंदी, व्याजात सूट वगैरे सवलती देणे ह्यासंबंधीच्या शिफारसी कमिटीने सरकारला कराव्या.

वरील ठरावांच्या आधारे लोकमत तयार करण्यासाठी चार परिषदा व चार अभ्यास-शिबिरे संघटित करण्याचे ठरले. तसेच या प्रश्नावर महाराष्ट्रात सुमारे १५१२० केंद्रांत सघन प्रचार मोहीम करण्याचा आणि येत्या वर्षात पंचायतीचे किमान २५००० सभासद नोंदण्याचा निर्णय घेण्यात आला. ◎ ◎

### अजूनही असे घडते

महाडला पन्नास वर्षांपूर्वी डॉ. आंबेडकरांनी चवदार पाण्यासाठी करून सामाजिक विषमतेविरुद्ध केला. स्वातंत्र्योत्तर काळात अस्पृश्यां जिक न्याय मिळावा म्हणून अने करण्यात आले. सवर्णांच्या अन्याय कीला कंटाळून बाबासाहेबांनी हिं त्यागही केला. त्यालाही वीस वर्षे तरीही सामाजिक विषमतेचा हा नही होता तेथेच आहे. आजही ग्रा बहिष्कार टाकणे, सार्वजनिक पाण त्यांना पाणी भरण्यास मज्जाव करणे, विहिरीत मलमूत्र टाकणे, किराणा देण्यास मनाई करणे, दलित स्त्रियां बना करणे, इत्यादी प्रकार खेडोपाडी आहेत.

हरिजनांवर होणाऱ्या अत्याचारांचे निवेदन रिपब्लिकन पक्षाचे चिट व्ही. डी. मेश्राम यांनी चंद्रपूर जिल्हा यांचेकडे पाठवले आहे. शासनाने दनाची तात्काळ दखल घेऊन असे पुन्हा घडणार नाहीत अशी काळजी पाहिजे.

या निवेदनात पार्लीच्या सवर्णांनी हरि विहिरीत त्याचप्रमाणे सार्वजनिक मलमूत्र टाकले असल्याचे स्पष्टपणे आहे. त्याचप्रमाणे हरिजनांवर टाकणे, त्यांना शेतावर काम न देणे देणे इत्यादी उपाय सवर्णांनी अवलंब असे म्हटले आहे.

या सर्व प्रकरणात शासनाने हस्तक्षे नागरी हक्क संरक्षण कायद्याखाली य कारवाई करावी अशी मागणी दलित केली आहे. ही मागणी मान्य न येत्या ११ एप्रिलपासून पार्ली येथी दलित कार्यकर्ते बेमुदत उपोषणास आहेत.

सरकारी अधिकारी दलितांच्या या मागणीची दखल घेऊन प्रकरण चिघळणार नाही अशी दक्षता काय ?

# एक हृदयस्पर्शी कार्यक्रम

...त्या पोर्तुगीज चर्चजवळच्या सर्वमंगल सोसायटीतील एका ...च्या कार्यक्रमासाठी श्री प्रभूभाई संघवी यांचे निकटवर्ती मित्र ... आहेत. सत्तरीच्या आसपासच्या एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे, पु. बा. मंडलिक यांच्यापासून तो विशीच्या उंबरठ्यापाशी उभ्या ...णाऱ्या तरुणांपर्यंत अनेक पिढ्यांची हजेरी आहे.

...यांनी चौपन वर्षे पूर्ण करून पंचावन्नाव्या वर्षात पदार्पण केले हे ... एक निमित्त. पण खरे म्हणजे आणीबाणीच्या काळातील ...च्या कामगिरीचा गौरव करावा ही त्यामागची इच्छा.

...रंभात तसा औपचारिकपणा नाही. गप्पागोष्टींच्या स्वरूपात ...क्रम सुरू होतो आणि आठवणीमागून आठवणी उलगडत ...तात.

...ष्ट्र सेवा दलातून तयार झालेल्या अव्वल पिढीतले लोक आता ...रीच्या आसपास आहेत. प्रभूभाईंच्या या समवयस्कांनी त्या ...ळातली आपली स्वप्ने आणि अनुभव, ते काळ पुन्हा जगत असल्याच्या ...पद्धतीने सांगितले. त्या काळातल्या नाना धडपडींची ती मनोरम ...णि स्फूर्तिदायक होती.

...युक्त महाराष्ट्राच्या चळवळीत एसेम जोशींचे वैयक्तिक चिटणीस ...म्हणून त्यांनी कार्यक्षमपणे जी कर्तबगारी बजावली त्याचे चित्रही ...े होते.

...आणीबाणीच्या काळात प्रभूभाईंनी ज्या बिनबोभाटपणे आणि निर्भय ...पणतेने काम केले त्यांतील काही रोमांचकारी आठवणी काही ...ळींनी सांगितल्या. प्रभूभाईंची कार्यक्षमता जणू पूर्णांगी फुलून ...ली होती. लोकशाहीच्या पुन:स्थापनेच्या लढ्यात ज्यांनी अनामिक ...न कार्य केले त्यात प्रभूभाई अग्रणी शोभतील.

...राष्ट्रातील लोकशाहीच्या पुन:स्थापनेच्या चळवळीचे ते प्रमुख ...धार होते ही गोष्ट काही प्रमाणात लोकांना माहीत आहे. ...षत: श्रीमती मृणाल गोरे यांच्या अटकेच्या संदर्भातील त्यांची ...मगिरी आता कर्णोपकर्णी झाली आहे. पण देशातल्या कामातही ...चा वाटा मोठा होता.

...कारने अभिसरणाच्या सर्व साधनांवर निर्घृण अशी बंधने घातल्या... ...र ती भेदून त्यांनी जे काम केले ते अपूर्व म्हणावे लागेल. ...शातील जुलुम-जबरदस्तीच्या कहाण्या जगाच्या वेशीवर टांगण्यात ...नी यश मिळवले. सरकारी बंधनांवर त्यांनी जबरदस्त अशी ...त केली.

...या निवडणुकीत जी शांततामय क्रांती घडून आली तिच्यामागे ...ा किती तरी मूक सेवकांचे कार्य आहे.

...चा लोकसंग्रह फार मोठा आणि संकुचिततेच्या सर्व भिंती ओलां... ...रा आहे. माणसांची त्यांची पारख अचूक आहे आणि 'साहे ...से त्यास तेचि द्यावे' ही योजकता दुर्मिळ आहे.

...प्रवासारख्या देशात पंचावन्नाव्या वर्षातील प्रवेश म्हणजे ऐन उमे...ा कालाचा प्रारंभ असतो, अशी भावना या प्रसंगी व्यक्त ...करण्यात आली ती यथार्थ होती.

लढ्याचा काळ आता मागे पडला असून संघटित विधायक कर्तृत्वाचा नवा कालखंड आता सुरू होत आहे. प्रभूभाईंच्या गेल्या तीन तपांतील या क्षेत्रातील अनुभवही वाखाणण्यासारखा आहे. राष्ट्र सेवा दलाचे सर्ववेळ सेवक म्हणून त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. युसुफ मेहेरअल्लींच्या स्मरणार्थ उभे राहिलेले मुंबईतील विद्यालय म्हणजे प्रभूभाई व त्यांचे सहकारी यांच्या चिकाटीचे एक प्रतीकच समजावे लागेल अशी कामांची यादी करायची तर ती पुष्कळच मोठी होईल.

गप्पागोष्टींचा, आठवणींच्या ह्या कार्यक्रमाला चांगलीच रंगत चढली होती. अनेक जुने-नवे मित्र या निमित्ताने एकत्र आले होते. जनता पक्षाच्या अभूतपूर्व विजयाची पार्श्वभूमी या सर्व कार्यक्रमाला होती.

प्रभूभाई स्वस्थ बसलेले नाहीत; ते त्यांना शक्यही नाही. नवभारताच्या जडण-घडणीचे आराखडे त्यांच्या मनात आकाराला येत आहेत. यापुढे त्याच कार्यात ते आपली शक्ती वेचणार आहेत. विजयाची नशा येऊ न देता त्या विजयावर आरूढ होऊन नव्या उड्डाणाची तयारी करण्यात प्रभूभाई मग्न आहेत.

बैठक संपवून सर्व मंडळी गच्चीवर आस्वाद्य वस्तूंचा उपभोग घेत पुन्हा कोंडाळे करून गप्पा मारीत कितीतरी वेळ रेंगाळत राहिली.

श्री प्रभूभाईंसारखी धडपडणारी तरुण मंडळी राष्ट्राचा कस दाखवत असतात आणि उज्ज्वल भवितव्याबद्दलची भावना दृढ करत असतात.

◎ ◎

---

## षष्ठ्यब्दपूर्ती

## डॉ. माधवराव वैद्य

घटप्रभेच्या आरोग्यधामाचे डॉ. माधवराव वैद्य आपल्या सहृदय सेवा-वृत्तीने ख्याती पावले आहेत.

साठ वर्षे पूर्ण करून त्यांनी एकसष्टाव्या वर्षात नुकतेच पदार्पण केले.

डॉ. माधवराव वैद्य यांची समर्पण भावना मिशनऱ्यांच्या तोडीची आहे.

कर्नाटक आरोग्यधामात सर्वत्र त्यांच्या सहृदयतेच्या पाऊलखुणा दिसतील.

पण त्यांची वाट तशी सुगम नाही. मनस्ताप देणारे व शक्तिव्यय करणारे प्रसंग त्यांच्यावरही येतात तेव्हा मन विषण्ण होते. त्यांच्या सहवासात चार घटका राहिले तर त्यांची वेगळी जीवनदृष्टी सहज प्रत्ययास येते.

घटप्रभेच्या कर्नाटक आरोग्यधामाची कीर्ती देशात व परदेशांतही झाली आहे.

डॉ. माधवराव वैद्यांचे परिपक्व कुशल मार्गदर्शन संस्थेला बहुतकाळ लाभावे आणि त्यांच्या सहृदयतेच्या परीसस्पर्शाने लोकांना निकोप शरीर-मन लाभावे ही सदिच्छा !

◎ ◎